**(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठीत भाषांतर )**

**सर्वोच्च न्यायालय अहवाल - (१९९६) १ एस. सी. आर. -११२६-११३१**

**दिवाणी अपिलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. २५९९-२६०१/१९९६.**

**विशाखापट्टनम डॉक लेबर बोर्ड**

**विरुद्ध**

**ई. अत्वन्ना आणि इतर .**

**१ फेब्रुवारी १९९६**

**[एस.सी.अग्रवाल आणि जी.टी.नानावटी, न्यायमूर्ती ]**

सेवा कायदा- जन्म अधिसूचना तारखेत बदल-अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केलेली भारत सरकारने जारी केलेली ३०.११.१९७९ ची अधिसूचना-अधिसूचना लागू होण्याच्या तारखेपासून ५ वर्षांच्या आत उमेदवारांनी पावले उचलणे आवश्यक आहे.

उत्तरवादी १९६१ ते १९६९ दरम्यान मजदूर म्हणून अपीलकर्त्याच्या सेवेत भरती झाले. त्यांच्या नियुक्तीच्या वेळी उत्तरवादींनी त्यांच्या जन्मतारखेबाबत कोणताही पुरावा सादर केला

नव्हता. त्यामुळे त्यांच्या शारीरिक स्वरूपावरून त्यांचे जे वय निश्चित करता येऊ शकत होते , त्याची नोंद त्यांच्या सर्व्हिस बुकमध्ये करण्यात आली. उत्तरवादींचे नियत सेवा निवृत्तीचे वय एप्रिल ते जुलै १९९५ दरम्यान पूर्ण होणार असल्याने त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या तारखांबाबत स्वतंत्रपणे माहिती देण्यात आली. उत्तरवादींनी अपीलकर्त्यास पंचायत अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे त्यांच्या जन्मतारखा दुरुस्त करण्यासाठी निवेदन दिले व त्यांच्या वयाची खात्री करण्यासाठी त्यांना वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्याची विनंती केली. ही विनंती फेटाळण्यात आली. योग्य जन्मतारखेच्या आधारे नियत सेवानिवृत्तीचे वय पूर्ण होईपर्यंत सेवेत कायम राहण्यास ते हक्कदार असल्याचे जाहीर करावे, अशी विनंती करणारी याचिका उत्तरवादींनी उच्च न्यायालयात दाखल केली. उपरोक्त विनंतीला विकल्प म्हणून त्यांचे खरे वय निश्चित करण्यासाठी त्यांना वैद्यकीय मंडळाकडे पाठवावे आणि मंडळाने निर्धारित केलेल्या वयानुसार त्यांना सेवेत पुढे कायम ठेवावे, अशी विनंतीही त्यांनी केली. या याचिका फेटाळून लावत त्या उच्च न्यायालयाच्या एकल न्यायाधीशांनी म्हटले की, भारत सरकारने जारी केलेल्या ३०.११.१९७९ च्या अधिसूचनेपासून ५ वर्षांच्या आत जन्मतारखेच्या दुरुस्तीची तारखेच्या विनंती केली गेली नसल्यामुळे अपीलकर्त्याने त्यांच्या विनंतीची दखल न घेणे समर्थनीय आहे आणि त्या कारणास्तव, त्यांना वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्याची विनंती देखील मंजूर केली जाऊ शकत नाही. रिट अपिलांमध्ये, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अंतरिम आदेश देत आरोग्य सेवा संचालकांना एक तारीख निश्चित करण्याचे आणि त्यानुसार

अपीलकर्त्यांना त्यांच्यासमोर किंवा त्यांच्याद्वारे स्थापित मंडळासमोर शास्त्रीय चाचण्यांद्वारे त्यांचे वय निश्चित करण्यासाठी हजर राहण्यासाठी कळविण्याचे निर्देश दिले. अपीलकर्त्याने हा आदेश रद्द न केल्यास अपीलकर्त्यांच्या प्रकरणाबाबतीत गंभीर बाधा निर्माण होईल, असा युक्तिवाद करत वादकालीन टप्प्यावर असा आदेश पारित करण्याच्या औचित्याला आव्हान दिले .

अपिलांची दखल घेत या न्यायालयाने पुढील आदेश पारित केले .

निर्णय : उत्तरवादी यांचा सेवा  प्रवेश १९६१ ते १९६९ या कालावधीत होता. २५ वर्षांहून अधिक काळ सेवेत राहिल्यानंतर त्यांनी आपल्या जन्मतारखेत बदल करण्यासाठी अर्ज केला आणि तोही सेवानिवृत्तीसंदर्भात नोटीस मिळाल्यानंतर. उत्तरवादींनी  त्यांच्या जन्मतारखेत बदल करण्याचे कारण असे दिले की केवळ त्यांच्या शारीरिक स्वरूपाच्या आधारे त्यांचे वय सेवा पुस्तकात नोंदवले गेले. तसे असू शकते, पण त्यांच्या उपस्थितीत त्याची नोंद झाली नाही, असे त्यांचे म्हणणे नव्हते. केवळ ते निरक्षर आहेत आणि त्यांनी सेवा नोंदींमध्ये अंगठ्याचा ठसा उमटवला आहे म्हणून त्यांना त्यांच्या जन्मतारखेच्या संदर्भात त्यात काय नोंदवले आहे हे माहित नव्हते यावर विश्वास ठेवणे शक्य नाही. तसेच अपीलकर्त्याने , जन्मतारीख बदलण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबावयाची याची विहित माहिती देणारी अधिसूचना भारत सरकारने दिनांक ३०.११.१९७९ रोजी जारी केल्यानंतर दिनांक १०.७.१९८७ रोजी एक परिपत्रक जारी करून ती माहिती सर्व संबंधितांना कळविली होती. अपीलकर्ता हा केंद्र सरकारचा उपक्रम आहे आणि

मूलभूत नियम ५६(एम) मध्ये टीप ५ म्हणून समाविष्ट केलेली ही अधिसूचना उत्तरवादींना लागू होते. म्हणूनच, त्यांच्या जन्मतारखेत बदल करण्यासाठी उत्तरवादींना ही अधिसूचना लागू झाल्याच्या तारखेपासून ५ वर्षांच्या आत पावले उचलणे आवश्यक होते. अपीलकर्त्याने परिपत्रक जारी केल्यानंतरही उत्तरवादींनी वाजवी वेळेत अपीलकर्त्याशी संपर्क साधला नाही. आपल्या योग्य जन्मतारखेबाबत खंडन न करता येण्याजोगे पुरावे न देणाऱ्या प्रमाणपत्रांच्या आधारे बदल करण्याची मागणी उत्तरवादींनी केली होती, आणि या सर्व मुद्द्यांवर निर्णय न देताच आक्षेपित आदेश पारित करणे उचित नव्हते . प्रतिवादींना वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्याची विनंती अपीलकर्त्याने फेटाळून लावली. ही प्रार्थना विद्वान एकल न्यायाधीशांनीही फेटाळून लावली. तसे करायला हवे होते की नाही, हा मुद्दा देखील एक अपिलांमध्ये निर्णयासाठी आहे. वादकालीन टप्प्यावर दिलेल्या निर्देशामुळे अपीलकर्त्याच्या खटल्यात गंभीर बाधा निर्माण होण्याची दाट शक्यता होती. [११३०•ई-एच; ११३१-ए-सी]

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक २५९९-२६०१/१९९६

डब्ल्यू.ए.क्र.१०२४-२६/१९९५ मधील आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या दिनांक १०.१०.९५ च्या निर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यातर्फे - अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ए. जयराम, सी. के. शशि आणि कैलास वासदेव.

उत्तरवादिंतर्फे - ल. नागेश्वर राव आणि एस. उदयकुमार सागर .

न्यायालयाचा निर्णय न्यायमूर्ती नानावटी यांनी पारित केला .

अनुमती देण्यात आली .

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने रिट अपील क्रमांक १०२४, १०२५ आणि १०२६/१९९५ मध्ये दिलेल्या सामायिक आदेशाविरुद्ध  हे अपील दाखल करण्यात आले आहे.

१९६१ ते १९६९ दरम्यान उत्तरवादी मजदूर म्हणून अपीलकर्त्याच्या सेवेत भरती झाले . नियुक्तीच्या वेळी उत्तरवादींनी त्यांच्या जन्मतारखेबाबत कोणताही पुरावा सादर केला नव्हता. त्यामुळे त्यांच्या शारीरिक स्वरूपावरून त्यांचे जे वय निश्चित करता येऊ शकत होते , त्याची नोंद त्यांच्या सर्व्हिस बुकमध्ये करण्यात आली. उत्तरवादींचे नियत  निवृत्तीचे वय एप्रिल ते जुलै १९९५ दरम्यान पूर्ण होणार असल्याने त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या तारखांबाबत स्वतंत्रपणे माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यांनी पंचायत अधिकाऱ्यांनी दिलेल्या दाखल्यांच्या आधारे त्यांची जन्मतारीख दुरुस्त करण्यासाठी अपीलकर्त्यास निवेदन दिले. त्यानंतर त्यांनी अपीलकर्त्याला विनंती केली की, त्यांचे वय निश्चित करण्यासाठी त्यांना वैद्यकीय मंडळाकडे पाठवावे. अपीलकर्त्याने त्यांची विनंती मान्य न केल्याने त्यांनी उच्च

न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या. त्यांनी त्यांच्या योग्य जन्मतारखेच्या आधारे गणना केलेल्या सेवानिवृत्तीचे वय पूर्ण होईपर्यंत ते सेवेत कायम राहण्यासाठी हक्कदार असल्याचे जाहीर करण्याची विनंती केली. उपरोक्त विनंतीला विकल्प म्हणून, अपीलकर्त्याला त्यांचे वास्तविक वय निश्चित करण्यासाठी त्यांना वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्याचे निर्देश द्यावेत आणि मंडळाने निर्धारित केलेल्या वयानुसार त्यांना सेवेत पुढे कायम ठेवावे, अशी विनंतीही त्यांनी केली. या याचिकांवर त्या न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांसमोर सुनावणी झाली. त्यांनी उत्तरवादींनी सादर केलेल्या दाखल्यांच्या सत्यतेवर शंका तर घेतलीच, पण भारत सरकारने जारी केलेल्या ३०.११.१९७९ च्या अधिसूचनेपासून ५ वर्षांच्या आत जन्मतारखेच्या दुरुस्तीची विनंती करण्यात आली नसल्याने अपीलकर्त्याने त्यांच्या विनंतीची दखल न घेणे योग्य असल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे त्यांना वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्याची विनंतीही मान्य करता येणार नाही, असेही विद्वान न्यायमूर्तींनी म्हटले आहे. त्यामुळे त्यांनी २७.४.१९९५ च्या आपल्या सामायिक आदेशाद्वारे याचिका फेटाळून लावल्या.

दिनांक १७.७.१९९५ रोजी उत्तरवादींनी उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर रिट अपीले दाखल केली. दिनांक १०.१०.१९९५ रोजी कोणताही ठोस आदेश देण्यापूर्वी त्यांच्यासमोर अपीलकर्त्यांच्या वयाचे स्वतंत्र मूल्यमापन झाले पाहिजे असे खंडपीठाचे मत तयार होऊन त्यांनी अंतरिम आदेशाद्वारे खालील निर्देश दिले -

(१) संचालक, आरोग्य विषयक सेवा आंध्र प्रदेश राज्य यांना असे निर्देश दिले जातात कि

एक तारीख निश्चित करावी आणि त्यानुसार उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक चाचण्यांद्वारे वय निश्चित करण्यासाठी अपीलकर्त्यांनी त्यांच्या समोर अथवा त्यांच्याद्वारे स्थापित मंडळासमोर हजर राहण्याची सूचना द्यावी .

(२) त्यानुसार अपीलकर्त्यांना असे निर्देश दिले जातात कि त्यांनी संचालक, आरोग्य सेवा कार्यालयाकडून त्यांच्या उपस्थित राहण्यासाठी कोणती तारीख निश्चित केली आहे याची माहिती घ्यावी आणि आरोग्य सेवा संचालकांनी हजर राहण्याचे निर्देश दिल्यावर त्यानुसार हजर व्हावे.

(३)आरोग्य सेवा संचालकांना निर्देश देण्यात येतात कि त्यांनी अपीलकर्त्यांच्या वयाबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करावा.

वरील सर्व बाबींचे पालन एका महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे. अपिले एक महिन्यानंतर सुनावणीसाठी ठेवावीत .

वादकालीन टप्प्यावर असा आदेश देण्याच्या औचित्यावर अपीलकर्त्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हा आदेश रद्द न केल्यास अपीलकर्त्यांच्या प्रकरणाबाबतीत गंभीर बाधा निर्माण होईल, असा युक्तिवाद करण्यात आला. दुसरीकडे, उत्तरवादीच्या विद्वान वकिलांनी यापूर्वीही उच्च न्यायालयाने अशाच प्रकरणांमध्ये असे आदेश दिले होते असे कारण देऊन या आदेशाचे समर्थन केले .

भारत सरकार विरुद्ध हरनाम सिंग १९९३ (२) एससीसी १६२ या खटल्याचा निपटारा

करण्याची संधी या न्यायालयाला मिळाली जिथे एका कर्मचाऱ्याने जन्मतारखेच्या दुरुस्तीसाठीचा अर्ज त्याला त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेबद्दल सूचित केल्यानंतरच आणि भारत सरकारच्या ३० नोव्हेंबर १९७९ च्या अधिसूचनेची अंमलबजावणी झाल्यापासून ५ वर्षांच्या कालावधी नंतर केला होता . त्या प्रकरणामध्ये सरकारी सेवेतील प्रवेश हा १९५६ मध्ये झाला होता आणि जन्मतारीख दुरुस्तीसाठी १९९१ मध्ये अर्ज करण्यात आला होता . या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले कि, सेवेत रुजू झाल्याच्या तारखेपासून सुमारे ३३ वर्षांच्या कालावधीसाठी कर्मचाऱ्याची निष्क्रियता त्याला सेवा अभिलेखात नोंदीत त्याच्या जन्मतारखेची नोंद योग्य नसल्याचे आणि केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाने त्याची जन्मतारीख दुरुस्त करण्याचे निर्देश जारी करताना चूक केली, असे दर्शविण्यास अडथळा निर्माण करते . या न्यायालयाने पुढे खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे :

> ...एका सरकारी कर्मचाऱ्याला त्याच्या जन्म तारखेमध्ये दुरुस्ती करून मागण्याचा अर्ज करण्याचा पर्याय खुला आहे . जर त्याच्याकडे त्याच्या जन्मतारखेशी संबंधित खंडन न होण्याजोगा पुरावा असेल जो वर नोंदवलेल्या पुराव्यापेक्षा वेगळा असेल आणि जरी जन्मतारखेच्या दुरुस्तीसाठी मर्यादित कालावधी विहित केलेला नसला तरी सरकारी कर्मचाऱ्याने असंयुक्तिक उशीर न करता तसे करणे आवश्यक आहे . नियमांमध्ये कोणतीही तरतूद नसल्यामुळे व जन्मतारखेच्या दुरुस्तीअभावी, दिरंगाई किंवा शिळ्या दाव्यांच्या आधारे दिलासा नाकारण्याचे सर्वसाधारण तत्त्व सर्वसाधारणपणे न्यायालये व

न्यायाधिकरणांकडून लागू केले जाते. तरीही सेवा नियमांमध्ये कालमर्यादा निश्चित करणे सरकारला शक्य आहे, त्यानंतर सरकारी कर्मचाऱ्याचा जन्मतारीख दुरुस्त करण्याबाबतचा कोणताही अर्ज ग्राह्य धरला जाऊ शकत नाही. त्यामुळे ज्या सरकारी कर्मचाऱ्याने, जी निश्चित केलेली आहे , त्या वेळेच्या पलीकडे , जन्मतारखेच्या दुरुस्तीसाठी अर्ज केला आहे, तो नोंदवलेली जन्मतारीख स्पष्टपणे चुकीची आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याच्याकडे चांगले पुरावे असूनही, तो त्याचा हक्क म्हणून आपल्या जन्मतारखेच्या दुरुस्तीचा दावा करू शकत नाही. मुदत बाध कायदा कठोर असू शकतो असे असले तरी तो पूर्ण काटेकोरपणे लागू करावा लागतो आणि जे आपल्या हक्कांबाबत जागरूक नसतात आणि वेळेची मर्यादा संपून जाऊ देतात त्यांच्या मदतीला न्यायालये किंवा न्यायाधिकरणे येऊ शकत नाहीत . बदल न केल्यास, नोंद केल्याप्रमाणे त्याची जन्मतारीख त्याच्या सेवानिवृत्तीची तारीख निश्चित करेल, जरी ते त्याच्या वास्तविक वयाच्या आधारावर सेवेत राहण्याचा अधिकार काढून घेण्यासारखे असले तरीही.

दुरुस्तीसाठी अर्ज करण्यास उशीर होण्यासंदर्भात या प्रकरणांतील तथ्ये हरनाम सिंग यांच्या प्रकरणातील (उपरोल्लेखित) वस्तुस्थितीशी जवळजवळ मिळतीजुळती आहेत. १९६१ ते १९६९ या कालावधीत उत्तरवादींचा सेवा प्रवेश झाला. २५ वर्षांहून अधिक काळ सेवेत राहिल्यानंतर त्यांनी आपल्या जन्मतारखेत बदल करण्यासाठी अर्ज केला आणि तोही त्यांच्या सेवानिवृत्तीसंदर्भात नोटीस मिळाल्यानंतर. उत्तरवादींनी त्यांच्या जन्मतारखेत बदल

करण्याचे कारण असे दिले की केवळ त्यांच्या शारीरिक स्वरूपाच्या आधारे त्यांचे वय सेवा पुस्तकात नोंदवले गेले. तसे ही असू शकते - पण त्यांच्या उपस्थितीत त्याची नोंद झाली नाही, असे त्यांचे म्हणणे नव्हते. केवळ ते निरक्षर असल्याने आणि त्यांनी आपल्या अंगठ्याचे ठसे सेवा अभिलेखामध्ये उमटवले होते म्हणून त्यांच्या जन्मतारखेच्या संदर्भात त्यात काय नोंदवले गेले आहे हे त्यांना माहित नव्हते यावर विश्वास ठेवणे शक्य नाही . तसेच, भारत सरकारने ३०.११.१९७९ रोजी अधिसूचना जारी करून जन्मतारीख बदलण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबावयाची याची माहिती दिल्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक १०.७.१९८७ रोजी एक परिपत्रक जारी केले होते आणि सर्व संबंधितांना त्याबाबत कळविले होते. अपीलकर्ता हा केंद्र सरकारचा उपक्रम आहे आणि ही अधिसूचना जी मूलभूत नियम ५६(एम) मध्ये टीप ५ म्हणून समाविष्ट केली गेली आहे ती उत्तरवादींना लागू होते. त्यामुळे जन्मतारखेत बदल करण्यासाठी उत्तरवादींनी ही अधिसूचना लागू झाल्यापासून ५ वर्षांच्या आत पावले उचलणे आवश्यक होते. अपीलकर्त्याने परिपत्रक जारी केल्यानंतरही, उत्तरवादींनी वाजवी वेळेत अपीलकर्त्याशी संपर्क साधला नाही. उत्तरवादींनी त्यांच्या जन्माच्या योग्य तारखांबाबत खंडन न करता येण्याजोगे पुरावे न देणाऱ्या प्रमाणपत्रांच्या आधारे बदल करण्याची मागणी केली होती. या सर्व मुद्द्यांवर निर्णय न घेता संबंधित निर्देश देणे योग्य नव्हते. उत्तरवादींना वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्याची विनंती अपीलकर्त्याने फेटाळून लावली होती . ती विनंती विद्वान एकल न्यायाधीशांनीही फेटाळून

लावली. तसे व्हायला हवे होते की नाही, हा मुद्दाच अपिलांमध्ये निर्णयासाठी आहे. वादकालीन टप्प्यावर दिलेल्या निर्देशामुळे अपीलकर्त्यांच्या खटल्यात गंभीर बाधा निर्माण होण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे हे अपील ग्राह्य धरून १० ऑक्टोबर, १९९५ रोजी रिट अपील क्रमांक १०२४, १०२५ आणि १०२६/१९९५ मध्ये पारित केलेले आदेश रद्द बातल ठरवण्यात येत आहेत . खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

आर.ए. अपीले मंजूर .

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x